# University of Mumbai

**क्र. Enrol./Admission/(2018-19)/ 1482 of 2018** **दि. 8th June, 2018**

## परिपत्रक

विषय - सर्व अभ्यासक्रमाचे व्दितीय, तृतीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे व्दितीय, तृतीय व चौथे वर्ष यांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत.

मुंबई विद्यापीठाचे सर्व विभाग प्रमुख/संलग्नित व संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की सन २०१७-१८ पासून सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश हे संगणकप्रणालीव्दारे सुरू करण्यात आले आहेत. त्याच प्रमाणे २०१७-१८ या वर्षी पासून पहील्यांदाच (Online payment) शुल्क स्विकारण्याची प्रकीया देखील N.E.F.T व्दारे करण्यास सुरवात केलेली आहे.

सर्व अभ्यासक्रमांचे व्दितीय,तृतीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे व्दितीय, तृतीय व चौथे वर्ष याची प्रवेश प्रक्रीया संगणकप्रणालीव्दारे MKCL च्या पोर्टलवरून करण्यात यावी जेणेकरून विभाग/महाविद्यालये/संस्था यांना विद्यार्थ्यांच्या परिक्षांचे अर्ज Online भरणे सोपे जाईल. जो पर्यंत विभाग/महाविद्यालये/संस्था यांच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश (सर्व अभ्यासक्रमांचे व्दितीय,तृतीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे व्दितीय, तृतीय व चौथे वर्ष) MKCL च्या पोर्टलवरून करण्यात येत नाहीत तोपर्यंत सदर विद्यार्थ्यांची हॉल तिकिटे देता येणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सर्व विभाग /महाविद्यालये/ संस्था, ज्यांनी सर्व अभ्यासक्रमांचे व्दितीय,तृतीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे व्दितीय, तृतीय व चौथे वर्ष या सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संगणकप्रणालीव्दारे MKCL च्या पोर्टलवरून केले नसतील त्यांनी त्वरित सदर प्रवेश दिनांक १५ जून, २०१८ पासून MKCL च्या पोर्टलवरून करून N.E.F.T च्या व्दारे पात्रता व प्रमाणपत्र तसेच नावनोंदणीची फी वगळता (नावनोंदणी आणि पात्रता प्रमाणपत्र चे शुल्क प्रथम वर्षी जमा केलेले आहेत) जे शुल्क भरावयाचे असेल ते नमुद केलेल्या मुंबई विद्यापीठाच्या बॅंक खाते क्रमांकावर जमा करावे. Mandate वर नमुद केलेल्या बॅंक खाते कमांकावर शुल्क जमा केलेले असेल त्याच बॅंक खाते कमांकावर N.E.F.T च्या व्दारे शुल्क जमा करावे.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र.)

प्रति,
प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था/विभाग.